पुण्य नगरी
कृषी नगरी
मंगळवार, १९ नोव्हेंबर २०१९ पुणे



# वसुंधरा दीक्षितने पटकाविले कांस्यपदक



**पुणे** : सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनच्या (सीबीएसई) वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वानवडीतील सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या वसुंधरा दीक्षितने कांस्यपदकावर मोहर उमटविली.

एरोबिक प्रकारात तिने ही चमकदार कामगिरी केली. अहमदनगरमधील समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये १० ते १२ नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडली. देशभरातील ८६ शाळांमधील स्पर्धक यात सहभागी झाले होते. वसुंधरा दीक्षित ही इयत्ता नववीमध्ये शिकत आहे.